लोकशाही वार्ता
# नागपूर
नागपूर, शुक्रवार, ४ जुलै २०२५/९

## ३,९९२ वाहन चालकांवर कारवाई

**लोकशाही वार्ता/नागपूर**

दारूबंदी तसेच एनडीपीएस कायद्यान्वये २१ प्रकरणांत २४ जणांकडून ९३ हजार ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ३ हजार ९९२ वाहन चालकांवर कारवाई केली. त्यांच्याकडून ४ लाख ३३ हजार ७५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. नागपूर शहर पोलिसांनी एकत्रितरित्या ही कारवाई केली. यापुढे देखील ही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. परिणामी, वाहन चालकांनी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे आवाहन करण्यात आले आहे.

गुड मॉर्निंग

## दुचाकी चोरट्यांला अटक

**नागपूर :** हुडकेश्वर पोलिस ठाणे हद्दीतून दुचाकी चोरणा-याला गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ५ च्या पथकाने अटक केली. राहुल राजु हटेवार (२४, कुंदनलाल गुप्तानगर) असे या चोरट्याचे नाव आहे. मागील सहा दिवसांपूर्वी आरोपीने एक दुचाकी चोरी केली होती. या तपासात हा आरोपी पोलिसांना गवसला. संतोषीनगर पिपळा येथे अभिषेक ईश्वर वानकर (३०) राहतात. मागील सहा दिवसांपूर्वी सकाळी त्यांनी (एमएच ४९ एवाय ३३९९) क्रमांकाची त्यांची दुचाकी प्लॉटनंबर १६, बेलदारनगर, नरसाळा येथे ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेली होती.

epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta

## कोराडीत ३.५२ लाखांची घरफोडी

**लोकशाही वार्ता/नागपूर**

घराच्या मागच्या दाराचे कुलूप आणि कडीकोंडा तोडून आत शिरलेल्या चोरट्यांनी आलमारीत ठेवलेली रोकड तसेच दागिन्यांवर हातसाफ केला. घरातील सदस्य बाहेरगावी गेले असता चोरट्यांनी ही घरफोडी केली. कोराडी पोलिस ठाणे हद्दीतील प्लॉट नंबर ७२, खरे निवास मागे, दुर्गा मातानगर, कोराडी फिर्यादी शुभम सत्यनारायण दुबे (३०) राहतात. गत मंगळवारी त्यांच्या घरचे सदस्य हे बाहेरगावी गेले होते. तर शुभम दुबे हे घराला कुलूप लावून कामावर गेले होते. यादरम्यान, चोरट्यांनी घरात संधी साधली. चोरट्यांनी दुबे यांच्या घराला लक्ष्य करीत त्यांच्या घराच्या मागच्या दाराचे कुलूप तोडले आणि आत प्रवेश केला. घरातील लोखंडी आलमारीचे लॉकर चोरट्यांनी तोडले. आलमारीत ५१ हजार रुपयांची रोकड तसेच सोन्या-चांदीचे दागिने ठेवले होते. हा सर्व ३ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल घेत चोरट्यांनी पळ काढला. या प्रकरणी शुभम दुबे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोराडी ठाण्याचे पोलिस निरीक्षक नवले यांनी अज्ञात आरोपींविरुद्ध कलम ३०५, ३३१(३), ३३१ (४) भान्यासं अन्वये गुन्हा दाखल केला.





गेली तीन-चार दिवस पावसाची कमी-अधिक प्रमाणात संततधार पहायला मिळाली. गुरुवारी दिवसभर पावसाने उसंत घेतली. मात्र सायंकाळी पुन्हा दमदार पाऊस बरसला.

## रस्ते अपघातात तिघांचा दुर्दैवी मृत्यू

### रस्ता ओलांडत असताना झाले अपघात

**लोकशाही वार्ता/नागपूर**

शहरात रस्ते अपघातात तीन ज्येष्ठ नागरिक पादचाऱ्यांचा मृत्यू झाला. रस्ता ओलांडत असताना भरधाव वाहनाने त्यांना धडक दिली. वाडी, मानकापूर तसेच हुडकेश्वर पोलिस ठाणे हद्दीत हे अपघात झाले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. तर वाडी अपघातातील क्रेन चालकाला अटक केली.




पहिल्या घटनेत दामोदर रामचंद्र रंगारी (७०, धम्मकीर्तीनगर, वाडी) हे बुधवारी सकाळी अमरावती-नागपूर मार्गावरून पायदळ जात होते. यावेळी भरधाव वेगाने येणाऱ्या (एमएच ४० पी ३०४४) च्या क्रेन चालकाने त्यांना धडक दिली. अंकुश रविशंकर तिवारी (२९, रामगंगू, तह. शिरमूर, जि. रिवा, मध्यप्रदेश) हा क्रेन चालवित होता. अपघातानंतर दामोदर रंगारी हे गंभीर जखमी झाले. त्यांना मेयो रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

या प्रकरणी दामोदर रंगारी यांचा मुलगा अमोल रंगारी (४२) यांनी दिलेल्या तक्रारीवरून वाडी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करीत आरोपीला अटक केली.

दुसऱ्या घटनेत मानकापूर हद्दीतील श्रीनगर ढोरे ले-आऊट येथे राहणारे गोपाल पांडुरंग देशकर (८४) मकबुल मशिदीपुढील रस्त्यावरून पायदळ जात होते. यावेळी (एमएच ४० वाय ४८४१) क्रमांकाच्या ट्रकचालकाने त्यांना धडक दिली आणि पळून गेला. अपघातात देशकर हे गंभीर जखमी झाले. मयो रुग्णालयात त्यांना दखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### हुडकेश्वरमध्ये भरधाव कारचालकाने चिरडले

**हुडकेश्वर पोलिस ठाणे हद्दीत प्रमोद गोविंदराव खोंडे (७८, एकमतनगर, बेसा-मानेवाडा रोड) हे मानेवाडा बेसा रोड, भवानी सभागृहाजवळून नेहमीप्रमाणे पायदळ फिरायला आले होते. यावेळी एमएच ४९ एएस ४८९८ क्रमांकाचा कारचालक अमितेश भीमराव भगत (चंद्रमणीनगर) याने कार भरधाव वेगाने पळवत खोंडे यांना धडक दिली. जखमी खोंडे यांना खासगी रुग्णालयात दाखल केले असता गुरुवारी सकाळी डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.**

# उझबेकिस्तानच्या महिलेकडून देहव्यापार

## हॉटेल पॅराडाईजमधील हायप्रोफईल देहविक्रीचा पर्दाफाश : महिलेसह दोघांवर गुन्हा

**लोकशाही वार्ता/नागपूर**

सीए रोड येथील हॉटेल पॅराडाईज येथे सुरू असलेल्या देहव्यवसाय अड्ड्यावर केलेल्या छापेमारीत पोलिसांनी एका उझबेकिस्तान येथील युवतीची सुटका केली. तर युवतीकडून देहव्यवसाय करून घेणाऱ्या एका महिलेसह दोघांवर गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने तहसील पोलिस ठाणे हद्दीत ही कारवाई केली. रश्मी आनंद खत्री (४९, गोविंदगड, उप्पलवाडी), कृष्णकुमार ऊर्फ राधे देशराज अशी आरोपींची नावे आहेत.



**या कारवाईत पोलिसांनी आरोपी महिलेचा मोबाईल, व्हॉट्सॲप चॅटमधील संभाषणे, तसेच अन्य पुरावे जप्त केले आहेत. या प्रकरणातील प्रमुख सूत्रधार कृष्णकुमार ऊर्फ राधे देशराज सध्या फरार आहे. त्याच्या शोधासाठी विशेष पथक तैनात करण्यात आले आहे. देहव्यवसाय अड्ड्यासाठी समाजमाध्यमावरून जाहिरात प्रकाशित केली जात होती. खत्री नावाची ही दलाल स्वत: समाजमाध्यमांवर ग्राहक शोधून आणत होती. नवी दिल्लीतील दलाल कृष्णकुमारच्या मदतीने तिने या उझबेकी महिलेला दोन दिवसांपूर्वी विमानाने नागपुरात आणले होते. सूत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार दोन दिवसांपासून ही उझबेकी तरुणी हॉटेलमध्ये वास्तव्यास होती.**

माहितीनुसार, गुन्हे शाखेचे पथक तहसील पोलिस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना त्यांना हॉटेल पॅराडाईज येथील खोली क्रमांक ४०३ मध्ये देहव्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळली. माहितीच्या आधारे पोलिसांनी गुरुवारी पहाटेपूर्वी या ठिकाणी छापा टाकला. छाप्यावेळी रश्मी खत्री आणि कृष्णकुमार देशराज हे दोघे पीडित युवतीकडून देहव्यवसाय करून घेताना आढळले. दोन्ही आरोपी आंबट शौकिनांना विदेशी मुली पुरविण्याचे काम करायचे. आरोपी युवतींना ग्राहक आणि देहव्यवसायासाठी जागा उपलब्ध करून देत आंबट शौकिनांकडून मोठी रक्कम वसूल करायचे. दरम्यान, कारवाईत पोलिसांनी पीडित विदेशी युवतीची सुटका केली. तर कारवाईत आरोपींच्या ताब्यातून २ भ्रमणध्वनी, डीव्हीआर, ५ हजार ५०० रुपयांची रोकड व इतर साहित्य असा एकूण ३९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर आरोपींविरुद्ध कलम १४३ (२) (३) भान्यासं, सहकलम ३, ४, ५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

## आंतरराज्यीय टोळीतील दोन चोरट्यांना अटक

**लोकशाही वार्ता/नागपूर**

चोरीत सक्रिय असलेल्या आंतरराज्यीय टोळीचा पोलिसांनी पदार्फाश केला. या टोळीतील दोन सदस्यांना अटक केली. चोरट्यांनी शहरात सुमारे सात चोरीच्या घटना केल्याची कबुली दिली. कारवाईत पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून ११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. माहितीनुसार, नागेश्वरनगरात अनुपम वाघमारे राहतात. त्या २१ जूनच्या रात्री घराला कुलूप लावून कुटुंबीयांसह पुलगावला गेल्या होत्या. यावेळी अज्ञात चोरट्यांनी घरात शिरत सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोकड चोरून नेली. या प्रकरणी पारडी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. तपासादरम्यान, पोलिसांना घराफोडीत सराईत असलेला संदीप टेंभेरे याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने ही चोरी केल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने पोलिसांनी मध्यप्रदेशातील सिवनी येथून संदीप आणि त्याचा सहकारी महेंद्र कुशवाह यांना अटक केली. चौकशीदरम्यान, आरोपीने शहरातील इतर सात ठिकाणी चोरी केल्याची कबुली दिली.

## मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद शाळेवर तत्काळ प्रशासक बसवा

### आमदार संदीप जोशी यांची मागणी

**लोकशाही वार्ता/नागपूर**

गुलशननगर येथील दि मातोश्री शोभाताई भाकरे मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा व कर्मशाळा येथील कर्मचारी समस्यांमुळे अडचणीत आहेत. संस्थाचालकांच्या धोरणामुळे शाळा कधीही बंद पडून कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येऊ शकते. त्यावर त्वरित उपाय म्हणून शाळेवर प्रशासक नेमण्यात यावा, अशी मागणी आमदार संदीप जोशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

यासंदर्भात आ. जोशी यांनी १२ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून संबंधित शाळेतील समस्यांचा पाढाच वाचला. मागील १० ते १५ वर्षांपासून शाळेत २६ कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेच्या



कारभारात अकार्यक्षमता, अपारदर्शकता तसेच शिक्षक कर्मचाऱ्यांवर अन्यायाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. नियमित मानधन, वेतन इत्यादींबाबत अनेक समस्या आहेत. संस्थेने काढलेले कर्ज फेडण्याकरिता संस्थाचालकांकडून कर्मचाऱ्यांना दरमहा एक हजार रुपयांची मागणी केली जाते. शाळेत ३५ तर कर्मशाळेत ३८ विद्यार्थी आहेत. मात्र, संस्थाचालकांच्या धोरणामुळे शाळा कधीही बंद पडून कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येऊ शकते. या गंभीर बाबी लक्षात घेता संस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्वरित प्रशासक नियुक्त करावा, अशी मागणी आमदार जोशी यांनी पत्रातून केली आहे.

या मागणीची दखल घेत माजी शिक्षक आमदार व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनीदेखील ३० जून रोजी अपंग कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे आणि आयुक्त प्रवीण पुरी यांना पत्र पाठवले. त्यांनीही संस्थेची परिस्थिती अत्यंत बिकट असून शिक्षक व कर्मचाऱ्यांवर दबाव टाकत धमकी देण्यात येत असल्याचे नमूद केले. त्यांनीदेखील प्रशासकाची तात्काळ नियुक्ती करण्याची गरज अधोरेखित केली.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी शाळांची

### स्कूल बसचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे - पोलिस आयुक्त

**लोकशाही वार्ता/नागपूर**

शहरातील काही शाळांच्या स्कूल बस आहेत. तर बहुतांश शाळांमध्ये खासगी वाहनांमधून विद्यार्थ्यांची ने-आण केली केली जाते. पण, यामुळे शाळांना विद्यार्थ्यांच्या



सुरक्षेची जबाबदारी झटकता येणार नाही. शाळांनी वाहतुकीची सेवा दिली नसली तरीही विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत जबाबदारी शाळेचीच राहणार आहे. महाराष्ट्र व मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) नियम २०११ अन्वये नागपूर शहर पोलिस आयुक्तालय आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांच्या परिवहन समितीची संयुक्त बैठक पोलिस भवन येथे पार पडली. सर्व स्कूल वाहन चालकांनी आपले व शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलिस आयुक्तांनी केले. बैठकीत नागपूर शहर वाहतूक व प्रादेशिक परिवहन विभागामार्फत मुख्याध्यापक, शाळेचे प्रतिनिधी, शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, पालक प्रतिनिधी, स्कूल बस, व्हॅन प्रतिनिधी यांना स्कूल बस मार्गदर्शन तत्त्वे, रस्ते अपघात, स्कूल बसमुळे होणारे अपघाताचे मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीला पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, सह.पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अप्पर पोलिस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेशी, पोलिस उपायुक्त नित्यानंद झा, सहा. पोलिस आयुक्त (वाहतूक) माधुरी बाविस्कर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (पूर्व) अविनाश राऊत उपस्थित होते.

**बैठकीत पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपस्थित सर्व अधिकारी तसेच शाळेच पदाधिकारी व पालकांना सूचना केल्या. विद्यार्थ्यास शाळेत पाठविताना स्कूल बस, व्हॅन चालकाची अचूक माहिती ठेवावी. शाळेतील प्राचार्यांनी मुलांची ने-आण, थांबा, वेळ याबाबत निश्चित करावे. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ बॅरिकेट लावावे, मुलांना शाळेत ने-आण करताना पालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे. ट्राफिक मित्रा व्हॉटसॲप क्रमांक व डायल ११२, सायबर क्राईम हेल्पलाईन, चाईल्ड हेल्प लाईन, ॲम्ब्युलन्स इत्यादी हेल्पलाईन नंबरची माहिती पोलिस आयुक्तांनी दिली.**

- **शालेय वाहनांच्या सुरक्षिततेसाठी समिती स्थापन अनिवार्य**
- **चालकाला किमान ५ वर्षांचा वाहन चालविण्याचा अनुभव आवश्यक**
- **चालकाची मुलांशी संबंधित कोणतीही गुन्हेगारीची नोंद नसावी**
- **स्कूल बसचा पिवळा रंग आणि त्यावर स्कूल बस लिहिलेले असणे आवश्यक**
- **स्कूल बसला फायर एक्स्टिंग्विशर, फर्स्ट एड बॉक्स, सेफ्टी ग्रील आवश्यक**
- **वाहनाचा वेग ४० कि.मी. प्रति तास आवश्यक**
- **पालकांना ई-रिक्षाने पाल्यांना पाठविणे टाळण्याचे आवाहन**
- **योग्य लॉक सिस्टीम, जीपीएस यंत्रणा अनिवार्य**

## धावत्या ट्रेनमध्ये महिलेला प्रसवकळा

### मेयोत दिला गोंडस बाळाला जन्म

### रेल्वे पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक


**लोकशाही वार्ता/नागपूर**



दुरंतो एक्स्प्रेसमधील एका प्रवासी महिलेला प्रसव कळा सुरू झाल्या. माहिती कळताच स्थानिक रेल्वे पोलिसांनी तत्परता दाखवून महिलेला तत्काळ वैद्यकीय मदत मिळवून दिली. नागपुरात मेयो रुग्णालयात या महिलेने गोंडस बाळाला जन्म दिला. हावडा-मुंबई दुरांतो एसी एक्स्प्रेस (ट्रेन क्र. १२२६२) रात्रीच्या शांततेत वेगाने मुंबईकडे जात होती. ट्रेनच्या ए-३ कोचमध्ये प्रवास करणाऱ्या एका गर्भवती महिलेला अचानक प्रसूती वेदना सुरू झाल्या. रात्री ९ वाजताच्या सुमारास ट्रेनच्या जोरदार धक्क्यांमुळे महिलेला असह्य वेदना होऊ लागल्या. सुरुवातीला तिने ते सहन करण्याचा प्रयत्न केला, परंतु वेदना इतक्या वाढल्या की कुटुंबातील सदस्य घाबरले. घाईघाईने त्यांनी रेल्वे हेल्पलाइन १३९ वर कॉल केला आणि मदतीची याचना केली. ट्रेनचा पुढचा थांबा नागपूर असल्याने हेल्पलाईनने ताबडतोब नागपूर रेल्वे पोलिसांना (जीआरपी) कळविले. नागपूर जीआरपीचे स्टेशन प्रभारी गौरव गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, पीएसआय अमोल इंगळे आणि त्यांच्या टीमने तात्काळ कारवाई सुरू केली. रात्री १० वाजता दुरांतो एक्स्प्रेस प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर थांबताच जीआरपी टीम आणि डॉक्टर कोचमध्ये पोहोचले. वेळ वाया न घालवता, टीमने स्ट्रेचर मागवले आणि काळजीपूर्वक महिलेला कोचमधून बाहेर काढले. तिला ताबडतोब रुग्णवाहिकेद्वारे मेयो हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. रुग्णालयात, डॉक्टरांनी महिलेची प्रकृती पाहिली आणि ताबडतोब उपचार सुरू केले. १२ वाजण्याच्या सुमारास एका निरोगी बाळाचा जन्म झाला.

## टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**वार्ताहर/वानाडोंगरी**



दुकानाकडे निघालेल्या मोपेडस्वार मालकाचा टिप्परच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. हा अपघात गुरुवारी (दि. ३) सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास वानाडोंगरी येथील वैभवनगर टर्निंगजवळ घडला. रोशन कृष्णराव चिव्हाणे (४२) रा. लोखंडेनगर, नागपूर असे मृतकाचे नाव आहे. रोशन चिव्हाणे यांचे हिंगणा येथे 'रोशन ट्रेडर्स' हे दुकान आहे. नेहमीप्रमाणे तो हिंगण्याकडे मोपेड क्र. एमएच ३१ ईव्ही ५६६१ जात असताना मागून येणाऱ्या टिप्पर (दहा चक्का) क्र. एमएच ३४ एम ७२४५ ने मोपेडला धडक दिली. यात टिप्परच्या चाकात सापडल्याने रोशनचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसीच्या पोलिस उपनिरीक्षक वैशाली साळुंके, कर्मचारी राजू शेंडे व स्टाफ घटनास्थळी दाखल झाले.तर टिप्पर व त्याचा चालक देवानंद किशन भंडारे (४५) रा. ईसासनी, ता. हिंगणा, नागपूर याला पोलिसांनी ताब्यात घेतले.

# भूजलाचे प्रदूषणापासून संरक्षण आवश्यक - उच्च न्यायालय

### शहरातील काही भागांतील भूजल प्रदूषणाची पातळी चिंताजनक

**लोकशाही वार्ता/नागपूर**

भूजलाला प्रदूषणापासून वाचविणे अत्यावश्यक आहे. कारण शहरात काही भागांतील स्थिती अत्यंत गंभीर आहे. यासाठी राज्य आणि स्थानिक यंत्रणांनी राबवावयाच्या उपाययोजनांचा तपशील २४ जुलैपर्यंत सादर करावा, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले. तसेच राज्य सरकार व केंद्रीय भूजल प्राधिकरणकडून राज्यात भूजलाचे प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याची अपेक्षा न्यायालयाने व्यक्त केली. सुनावणीदरम्यान न्यायालयास सांगण्यात आले की, केंद्रीय भूजल प्राधिकरणाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार भूजल उपसा करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे आवश्यक आहे.



महानगरपालिकेच्यावतीने शहराला पिण्याचे पाणी पुरवले जात असले तरी उन्हाळ्यात पाण्याच्या टंचाईच्या काळात विहिरींवर अवलंबून राहावे लागते. मात्र, या विहिरींची दुरवस्था इतकी गंभीर आहे की बहुतांश विहिरींचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचे खुद्द मनपानेच माहितीच्या अधिकाराखाली दिलेल्या उत्तरातून स्पष्ट झाले आहे. ही माहिती न्यायालयात सादर करून याचिकाकर्ते संदेश सिंगलकर यांनी या विहिरींची नकाशा-मोजणी (मॅपिंग) करण्याचे आदेश विरोधकांना देण्याची मागणी दाखल जनहित याचिकेतून केली होती. मागील सुनावणीदरम्यान काही भागांतील भूजल प्रदूषणाची पातळी चिंताजनक असल्याने उच्च न्यायालयाने जलसंपदा विभागाला प्रतिवादी म्हणून सामील करण्यास मान्यता दिली होती. गुरुवारी झालेल्या सुनावणीत दोन्ही पक्षांच्या विनंतीनुसार उच्च न्यायालयाने सुनावणी २४ जुलैपर्यंत पुढे ढकलली. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. स्मिता सिंगलकर यांनी मनपातर्फे ॲड. सुधीर पुराणिक आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे ॲड. सन्याल यांनी कामकाज पाहिले.

### सेंट्रल ग्राउंड वॉटर ॲथॉरिटीने उघड केल्या त्रुटी

**मागील सुनावणीत सेंट्रल ग्राउंड वॉटर ॲथॉरिटीने उच्च न्यायालयात प्रतीज्ञापत्र सादर करून विविध त्रुटींकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. या त्रुटींवर न्यायालयाने विभागाच्या वकिलांना प्रश्न विचारले, परंतु सुनावणीदरम्यान कोणताही अधिकारी उपस्थित नसल्यामुळे उत्तर मिळू शकले नाही. यासाठी न्यायालयाने अधिकाऱ्यांवर दंड ठोठावण्याची भावना व्यक्त केली होती. मात्र, पुढील तारखेला विभागाच्या वतीने सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आश्वासन दिल्यामुळे हा मुद्दा तात्पुरता टळला. विभागाच्या वतीने सांगण्यात आले की, अधिसूचित भागांशी संबंधित आवश्यक तपशीलांसह प्रतिज्ञापत्र सादर केले जाईल. तसेच केलेल्या सर्वेक्षणाचा आणि सर्वेक्षणाचे स्थळ यासंबंधीचा तपशीलही सादर केला जाईल.**

### शहरातील ८६० सार्वजनिक विहिरींपैकी एकही विहिरीतील पाणी पिण्यायोग्य नाही

**शहरातील विहिरींना पुनरुज्जीवित करण्यासाठी नीरीच्या प्रस्तावानुसार, शहरातील सर्व विहिरींच्या पाण्याची पातळी व गुणवत्ता, विहिरीची खोली व व्यास, पाण्यातील जैविक आणि रासायनिक तत्त्व, विहिरींचे जलस्रोत याबाबत सविस्तर अभ्यास केला जाईल. याशिवाय नामशेष झालेले भूजल स्रोत शोधण्यासाठी मॅपिंग करण्यात येईल. शास्त्रीय पद्धतीनुसार अभ्यास करण्यासाठी नीरीने ३६ लाख रुपये आणि त्यावर १८ टक्के जीएसटी असा प्रस्ताव दिला आहे. महापालिकेला ५० टक्के निधी अभ्यास सुरू होण्यापूर्वी तर त्यानंतरची २५ टक्के रक्कम निम्मे सर्वेक्षण झाल्यावर द्यायचे आहे. उर्वरित २५ टक्के रक्कम सर्व अभ्यास पूर्ण झाल्यावर द्यायची आहे. या अभ्यासासाठी सुमारे नऊ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. शहरात असलेल्या ८६० सार्वजनिक विहिरींपैकी एकही विहिरीतील पाणी पिण्यायोग्य नाही. त्यामुळे न्यायालयाने याबाबत नीरीकडून अभ्यास करण्याचा सल्ला दिला होता.**

## लिफ्टच्या खड्ड्यात पडलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**नागपूर :** भ्रमणध्वनीवर बोलण्यात मग्न असलेल्या एका व्यक्तीचा लिफ्टच्या खड्ड्यात पडल्याने मृत्यू झाला. हुडकेश्वर पोलिस ठाणे हद्दीत ही घटना घडली. राजेश गोविंदराव जगताप (३९, गोकूळ सोसायटी, बालाजी मार्केट, चिखली, पुणे) असे मृताचे नाव आहे. माहितीनुसार, हुडकेश्वर पोलिस ठाणे हद्दीतील सवश्रीनगर, दिघोरी येथील प्लॉट नंबर ८६, गजानन शाळेजवळ राजेश जगताप नातेवाईकाच्या अंत्यविधी कार्यक्रमाकरिता आले होते. गत मंगळवारी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास कार्यक्रम आटोपल्यानंतर ते भ्रमणध्वनीवर बोलता-बोलता जवळच सुरू असलेल्या एका नवनिर्माणाधीन इमारतीच्या महिल्या माळ्यावर आले. येथे भ्रमणध्वनीवर बोलताना ते इमारतीच्या लिफ्टकरिता खोदलेल्या पडले.

## दृष्टिक्षेप

### ‘अभिजात मराठी व महानुभाव साहित्य’ विषयावर व्याख्यान आज

**लोकशाही वार्ता/नागपूर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनाद्वारे महंत नागराजबाबा महानुभाव ( दिगांबर कपाटे ) स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन शुक्रवार, ४ जुलैला सायं. ४ वाजता करण्यात आले आहे. भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासन, गांधी भवन, एलएडी चौक, नागपूर येथे हे व्याख्यान होणार आले आहे. याप्रसंगी ‘अभिजात मराठी आणि महानुभाव साहित्य’ या विषयावर मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर जि. अमरावतीचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांचे व्याख्यान संपन्न होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे) भूषवतील. प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. सुभाष कोंडावार, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी अध्यासनाद्वारे घेण्यात आलेल्या महानुभाव संप्रदायातील विविध साहित्यकृतींवर आधारीत ग्रंथ परिक्षण स्पर्धेचे बक्षीस वितरण होणार आहे, तरी साहित्यिक, अभ्यासक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून या व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यासन प्रमुख प्रा. भारतभूषण शास्त्री यांनी केले आहे.

### ‘तुमसे मिलके दिल का जो हाल’ संगीतमय कार्यक्रम आज

**लोकशाही वार्ता/नागपूर**

व्हर्सटाईल सिंगर्स ग्रुपतर्फे ‘तुमसे मिलके दिल का हाल’ हा सदाबहार गाण्यांचा कार्यक्रम शुक्रवार, ४ जुलै रोजी आयोजित करण्यात आला आहे. लक्ष्मीनगर येथील सायंटिफीक सभागृहात सायंकाळी ५ वाजता हा संगीतमय कार्यक्रम होईल. कार्यक्रमाचे आयोजन व्हर्सटाईल सिंगर्स ग्रुपचे संचालक तुषार रंगारी यांचे आहे. कार्यक्रमाची संकल्पना अचल वालदे यांची असून सूत्रसंचालन नासिर खान करणार आहेत. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण गायक गौरी शिंदे, स्वाती खडसे, आर्य विघणे असणार आहेत. मुख्य अतिथी म्हणून आनंद राज आनंद, जया धाबेकर, स्वामिनाथन अय्यर राहणार आहेत. कार्यक्रमात गायक सी. वाय. रायपुरे, मोहन बार्शीकर, नरेश कावळे, समा सोलव, प्रज्ञा भेलवा, पी. विजयालक्ष्मी, धर्मेंद्र वर्मा, दिनेश मातुरकर, संदीप बोंद्रे, अपर्णा, व्हिक्टर करुझे, जितेंद्र वर्मा हे सर्व गायक गाणी सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे संगीत संयोजन महेंद्र ढोले यांचे असून तांत्रिक बाजू सहावींद्र बिसेन बघणार आहेत. कार्यक्रमाकरिता शैला काचोले, किरण भोसले, विजया वैद्य, वसंत बरडे व सुभाष दापूरकर विशेष सहकार्य लाभले. रसिकांनी निःशुल्क कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकां द्वारे करण्यात आले आहे.

### ‘बीआरएसपी’चे प्रशिक्षण शिबिर ५ व ६ जुलैला

**लोकशाही वार्ता / नागपूर**

आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने राज्यभर विभागीय स्तरावर कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. विदर्भ विभागीय स्तरावर प्रशिक्षण शिबिर ५ व ६ जुलै रोजी नागपूर जिल्ह्यातील चिचोली फेटरी येथे घेण्यात येणार आहे. या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराला बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सुरेश माने संबोधित करणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लक्षात घेता हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये कार्यकर्त्यांना राज्यातील चालू घडामोडींचा चळवळीवर होणारा परिणाम, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी कार्यकर्त्यांची जबाबदारी, बहुजन समाजातील युवकांना शिक्षण, बेरोजगारीचा भेडसावणाऱ्या समस्या या विषयांवर मार्गदर्शन डॉ. सुरेश माने करणार आहे. ६ जुलै रोजी पत्रकार परिषदेत आगामी निवडणुकीत पक्षाची भूमिका काय असेल, यावर निर्णय जाहीर करण्यात येणार असल्याची अशी माहिती बीआरएसपीचे उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. यापूर्वी पश्चिम महाराष्ट्र विभागीय प्रशिक्षण शिबिर २५, २६, २७ जून रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आले होते.


### वृक्षारोपणाने शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात डॉक्टर्स दिन साजरा

**लोकशाही वार्ता/नागपूर**

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग नागपूर आणि लॉयन्स क्लब नागपूर संस्कृती यांच्या संयुक्त विद्यमाने हॉस्पिटल उद्यान शासकीय आयुर्वेद रुग्णालय येथे डॉक्टर्स दिनाच्या औचित्याने वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता राजेंद्र सोनेकर, वरिष्ठ प्राध्यापक डॉ. कोडवानी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. विद्या वासनिक थटर आदी उपस्थित होते. यावेळी पाटला, शिवण, आम्र, रोहितक, लोध्र आदी औषधीं वनस्पतींची रोपे लावण्यात आली. तत्पूर्वी २७ मे ते १० जून या कालावधीत आयुर्वेद महाविद्यालयात १५ दिवसीय समर इंटर्नशीप कार्यक्रम पार पडला. यामध्ये ५ जून या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी वृद्धदारुक, कुष्ठ, अग्नि, मंथ, मांसरोहिणी, खंडू चक्का आदी औषधी वनस्पतींची रोपे लावण्यात आली. यावेळी प्रभारी अधिष्ठाता डॉ. कोडवानी, द्रव्य गुण विभाग प्रमुख डॉ. तलमले, डॉ. माधुरी वाघ आदी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### नत्थूजी पाटील



**बेला** : येथील वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक नत्थूजी गणपत पाटील यांचे वयाच्या १०३ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युपश्चात त्यांना पत्नी, मुलगा गणपत, ५ विवाहित मुली, नातवंडे व बराच आप्तपरिवार आहे. गावाबाहेरील वेणा नदी तीरावरील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### अन्नपूर्णाबाई जाधव



**रामटेक** : वाटखेड, जि. यवतमाळ येथील रहिवासी व पत्रकार अनिल जाधव यांची आई ग.भा. अन्नपूर्णाबाई पांडुरंग जाधव यांचे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा धानोरा गुरव, जि. अमरावती येथून निघून शांती घाटावर ४ जुलै रोजी दुपारी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येईल.

### गयाबाई रबडे



**नागपूर** : महेशनगर नागपूर येथील रहिवासी गणेश कपूरचंद रबडे (पांधराखेडीवाले) यांच्या आई गयाबाई कपूरचंद रबडे यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी गुरुवार, ३ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. शुक्रवारी सकाळी ११ वाजता अंत्ययात्रा महेशनगर येथील निवासस्थानावरून निघून मानकापूर घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल. त्यांच्यामागे तीन मुले व मोठा आप्तपरिवार आहे.

### ललिता नगरकर



**नागपूर** : सदर बुद्ध विहार येथील रहिवासी ललिता श्रीकांत नगरकर यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी १२ वाजता मानकापूर घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# खरीप हंगामाची ३५.४२ टक्के पेरणी आटोपली

## कापूस पिकांतर्गत ६५.४९ तर सोयाबीन ४०.१४ टक्के पेरणी

**लोकशाही वार्ता/नागपूर**

विभागात समाधानकारक पाऊस सुरू असल्यामुळे खरीप हंगामातील पेरण्यांना सुरुवात झाली आहे. खरीप हंगामामध्ये विभागातील सहाही जिल्ह्यात २ जुलैपर्यंत ३५.४२ टक्के पेरणी पूर्ण झाली असून सर्वाधिक ५८.९८ टक्के वर्धा जिल्ह्यात पेरणी झाली आहे.

विभागात कापूस व सोयाबीन पिकांची सर्वाधिक पेरणी झाली आहे. विभागात खरीप पेरण्यांमध्ये नागपूर जिल्ह्यात ४ लाख ६९ हजार ४३२ हेक्टर क्षेत्रापैकी १ लाख ३० हजार ८२१ हेक्टरमध्ये (२७.८७ टक्के) पेरणी पूर्ण झाली आहे. वर्धा जिल्ह्यात ४ लाख ६ हजार ५५४ सरसरी हेक्टरपैकी २ लाख ३९ हजार ७८१ हेक्टरमध्ये (५८.९८ टक्के) प्रत्यक्ष पेरणी झाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात ४ लाख ६३ हजार ४० हेक्टरपैकी २ लाख ३९ हजार ८८० हेक्टर (५३.७५ टक्के), गडचिरोली जिल्ह्यात १ लाख ९३ हजार ८६५ सरासरीपैकी ४० हजार ९३ हेक्टर (२०.६८ टक्के) सरासरी पेरणी पूर्ण झाली आहे. भंडारा व गोंदिया जिल्ह्यात बहुतांश क्षेत्रात भात लागवडीचे क्षेत्र आहे. विभागात सरासरी १८ लाख ९५ हजार ९१० हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ६ लाख ७१ हजार ५८४ हेक्टर क्षेत्रात सरासरी (३५.४२ टक्के) पेरणी पूर्ण झाली आहे.



**खरीप पेरण्यांमध्ये सर्वाधिक ६५.४९ टक्के क्षेत्रात कापूस लागवड पूर्ण झाली आहे. तसेच सोयाबीन पीकांतर्गत ४०.१४ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. ज्वारी ३५.१२ टक्के, भात १०.०६ टक्के, तूर ४३.२९ टक्के, मूग ११.८५ टक्के, उडीद २६.८३ टक्के, कडधान्य ४२.५१ टक्के, तीळ ३१.१८ एकूण गळीत धान्य ३९.८९ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे.**

**सोयाबीन पिकांतर्गत विभागात ३ लाख १४ हजार ४२७ सरासरी हेक्टर क्षेत्रापैकी १ लाख २६ हजार १९६ हेक्टरमध्ये पेरणी पूर्ण झाली आहे. कापूस पिकांतर्गत सरासरी ५ लाख ८६ हजार ८३० हेक्टर क्षेत्रापैकी ३ लाख ८४ हजार २९६ हेक्टर म्हणजेच सरासरी ६५.४९ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे.**

## आषाढी एकादशीला ‘पंढरीच्या वारी’चे आयोजन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

‘जाता पंढरीशी सुख वाटे जीवा आनंदे केशवा भेटताची’ सर्वांच्या मनाची आता अशीख अवस्था झाली आहे. प्रत्येक माणसाला वारीमध्ये जाण्याची इच्छा असते, पण ते काही कारणास्तव शक्य होत नाही. म्हणून आता नागपुरातच वारीचा आनंद घेता येणार आहे. दक्षिण-पश्चिम नागपूर येथील नागरिकांनी येत्या आषाढी एकादशीला वारीचे आयोजन केले आहे. रविवार, ६ जुलै ला सकाळी ८ वाजता श्री गणेश मंदिर, रवींद्रनगर येथून पंढरीच्या वारीला प्रारंभ होणार आहे.

पुरुषांनी पांढरा कुर्ता, पायजमा किंवा धोतर तर महिलांनी साडी व लुगडे परिधान करावे तसेच पारंपारिक पद्धतीने संतांच्या पादुकांची पालखी, टाळ,मृदंग, तुळशी वृंदावन, झेंडे पताकांच्या समवेत चालायचे आहे. आपल्या वस्तीतून प्रारंभ करून आपल्या सोबत अनेकांना जोडत टाळ मृदुंगाच्या आणि भजनांच्या गजरात सहभागी होण्याचे आवाहन करीत ही वारी रवींद्रनगर, फ्रेंड्स कालनी, टेलिकॉमनगर, रेल्वे कॉलनी, रामकृष्णनगर, पांडुरंग गावंडेनगर, संचयनी, इंद्रप्रस्थ कालनी, राधेमंगलम हॉल मेन रोड, रवींद्र नगर, मित्र गणेश मंदिर अशी राहणार आहे. वारी नंतर १०.३० वाजता रिंगण व विठ्ठलाची पूजा, महाआरती तसेच उपवासाचा महाप्रसाद होणार आहे. भक्तांनी यात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## आषाढी एकादशीनिमित्त पायदळ वारी

**वार्ताहर/बेला**

जवळच्या बरबडी येथील आदिनाथ गुरुमाऊली सेवाश्रमात हिंगणघाटच्या सेवा मंडळाचे वतीने आषाढी एकादशीनिमित्त हिंगणघाट येथून ३ जुलैपासून दिंडी, पालखी, भजन व वारकऱ्यांसह भक्तांची पायदळवारी निघाली आहे. पायदळवारीत सेवाश्रमचे संस्थापक, ब्रम्हमूर्ती शेषानंद पांडे महाराज (भद्रावती) प्रामुख्याने उपस्थित राहतील. परिसरातील भाविकांनी सहभागी होऊन पायदळ वारीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेवाश्रमचे अध्यक्ष ओमप्रकाश पांडे यांनी एका पत्रकान्वये केले आहे.

हिंगणघाट येथील संत कबीर वॉर्डातील हनुमान मंदिरसमोरील राजुजी मेघरे महाराज यांच्या घरासमोरून गुरुवारी सकाळी ९ वा.



पायदळ वारी, दिंडी पालखीसह निघाली. ४ जुलैला सकाळी ९ वा. हिंगणघाट येथून राष्ट्रीय महामार्ग जामकडे प्रस्थान होईल. दुपारी उबदा येथील हनुमान मंदिरमध्ये नितीन पिसे यांच्याकडून सहभोजन करून विश्रांती होईल. ५ जुलैला सकाळी ५ वा दिंडी पालखीचे बरबडीच्या दिशेने प्रस्थान होईल. रात्रौ बरबडी येथे मुक्काम होईल. सहभोजन सुरेश चंदनखेडे महाराज यांच्यातर्फे राहील. ६ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुख्मिनी मूर्तीचे गंगाजल अभिषेक पुजाराम खिरटकर व डॉ. श्याम माहुलकर बुटीबोरी यांच्या हस्ते होईल.

**सायकलस्वार वारकरी होणार सहभागी**

बेला व बरबडी येथून पंढरपूरला सायकलवारीने गेलेले आदिनाथ गुरुमाऊली सेवाश्रमाचे निसिम भक्त हभप लीलाधर महादेव शिंदेकर यांनी ८२१ कि.मी.चा सायकलने प्रवास करून मजल दरमजल करीत पंढरपूर गाठले आहे व विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेऊन परतीचे मार्गावर आहे. ते पुन्हा ८०० कि.मी. अंतर कापून हिंगणघाटला येत आहे. आल्यानंतर ते पायदळ वारीत सहभागी होणार आहेत. वारकरी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करतील, असे सेवाश्रमाचे वतीने कळविण्यात आले.

## सरकारी धान्य दुकानातील काळा बाजार थांबवा



**लोकशाही वार्ता / नागपूर**

दक्षिण नागपुरातील अनेक सरकारी रेशन दुकानदार धान्याचे अनियमितरीत्या वाटप करत आहे. धान्याऐवजी साखरेचे आमिष दाखवित ग्राहकांची दिशाभूल करीत असल्याची तक्रार शिवसेना (शिंदे गट) पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण नागपूर विधानसभा संघटक विशाल कोरके यांनी अन्नधान्य वितरण अधिकारी काळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

सरकारी रेशन दुकानदारांकडून शासन निर्णयाप्रमाणे रेशन कार्डधारकांना धान्य दिले जात नाही. नियमापेक्षा कमी धान्य दिले जात आहे. सरकारी धान्य दुकानदार तांदूळ आणि गव्हाऐवजी सर्रासपणे साखरेचे वाटप करीत आहे. शासनातर्फे साखर पुरवठा होत नसतांनासुद्धा दुकानदार धान्याऐवजी जास्त प्रमाणात साखर ग्राहकांना देत आहेत. तर गहू व तांदळाचे रेशन धान्य दुकानदार काय करतात, असा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा दुकानदारांचे परवाने रद्द करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. प्रत्येक धान्य दुकानाबाहेर ग्राहक तक्रार आणि अधिकाऱ्यांचे नंबर फलकावर लावण्यात आले, अशीही मागणी करण्यात आली. कारवाई न केल्यास शिवसेना दक्षिण नागपूरद्वारे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी धम्मा सोनटक्के, नीलिमा शास्त्री, राकेश भोंदले, उज्वला उंमरे, नलिनी सदावरती, पंकज ढोबळे, निरंजन नाकाडे, सोनाली उंबरे उज्ज्वला शंभरकर, आरती शर्मा उपस्थित होते.

## जैन संत पुलकसागरजी गुरुदेव यांचा चातुर्मास उदयपूरला होणार

**लोकशाही वार्ता/नागपूर**

जैन संत भारत गौरव राष्ट्रसंत मनोज्ञाचार्यश्री पुलकसागरजी गुरुदेवांचा वर्ष २०२५ यावर्षीचा चातुर्मास राजस्थानातील तलावाचे शहर, प्राकृतिक सौंदर्य व राजवाड्यांसाठी प्रसिद्ध असलेले शहर उदयपूर येथे होत आहे.



मीडिया प्रभारी रमेश उदेपूरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार १२ जुलैला दुपारी दोन वाजता महानगरपालिकेच्या टाऊन हॉल परिसरात हा कार्यक्रम होणार आहे. १३ जुलैला दुपारी दोन वाजता चातुर्मास मंगल कलश स्थापना कार्यक्रमाचे महानगरपालिकेच्या टाऊन हॉल परिसरात आयोजन केले आहे. कार्यक्रमाला नागपूर, वर्धा, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबईसह देशभरातून भक्त उपस्थित राहणार आहे. चातुर्मासात गुरुदेव श्री महावीर दिगंबर जैन जिनालय सर्व ऋतू विलास याठिकाणी विराजमान राहणार आहे. त्यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनात तयार झालेली देशभरातील मोठी संघटना पुलक मंच परिवाराच्या देशभरात शाखा कार्यरत आहेत.

## मनपातर्फे वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**नागपूर** : महाराष्ट्रातील कृषी क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेतर्फे मंगळवारी विनम्र अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आयोजित कार्यक्रमात मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी मनपाच्या उपायुक्त विजया बनकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, प्रजनन व बालकल्याण अधिकारी डॉ. सरला लाड, जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे रोहिदास राठोड, अर्जुन मुडे, अविनाश जाधव, अनिल राठोड, गजानन जाधव, अनिल चव्हाण, धनंजय जाधव, विनोद राठोड, विनोद डोंगरे, शैलेश जांभूळकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सिंदी स्थानकावर कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा समुपदेशन सत्र

**लोकशाही वार्ता/नागपूर**

मध्य रेल्वे नागपूर विभागामार्फत कर्मचाऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी नियमित क्षेत्रीय तपासण्या व समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांतर्गत सिंदी रेल्वे स्थानकावर ट्रॅक मशीन विभागातील पर्यवेक्षक व तंत्रज्ञांसाठी विशेष सुरक्षा तपासणी व समुपदेशन सत्र घेण्यात आले.

स्थानक क्षेत्रात तसेच ब्लॉक सेक्शनमध्ये ट्रॅक मशिनच्या सुरक्षित हालचालीसाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अभियांत्रिकी विभाग सुरक्षा सल्लागार पारस गजभिये, सिग्नल व दूरसंचार विभाग सुरक्षा सल्लागार नरेंद्र वाघमारे उपस्थित होते. तर या सत्राचे नेतृत्व नागपूरचे सहायक विभागीय सुरक्षा अधिकारी यांनी केले.

निरीक्षणादरम्यान सुरक्षित कार्यपद्धती, सिग्नलची स्पष्टता, गती मर्यादा पाळणे, तसेच ब्लॉकदरम्यान स्थानक कर्मचाऱ्यांशी व कंट्रोल कार्यालयाशी योग्य समन्वय साधणे या बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कर्मचाऱ्यांना संभाव्य धोके व सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. प्रत्यक्ष कामाच्या परिस्थितीचे निरीक्षण करून सुरक्षा निकषांचे पालन होत आहे की नाही, याची पडताळणीही यावेळी करण्यात आली.

## आंध्रप्रदेशातील हरविलेली महिला आढळली नागपुरात

### नागपूर रेल्वे विभागाच्या सीपीडीएस टीमने घेतला शोध

**लोकशाही वार्ता / नागपूर**

आंध्रप्रदेशातील काकीनावाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून हरविलेली महिला नागपूर रेल्वे स्थानकावर आढळली. ऑपरेशन ‘रेल पहरी’ अंतर्गत मध्य नागपूर रेल्वे विभागाच्या सीपीडीएस टीमने या महिलेला शोधून काढले.

१ जुलै २०२५ रोजी मध्य नागपूर रेल्वे विभागाचे आरपीएफ पोस्ट निरीक्षक अश्विनी कुमार यांना सीपीडीएस टीम व आरपीएफ निरीक्षक सत्येंद्र यादव यांच्याकडून सदर महिला हरविली असल्याची माहिती मिळाली. आंध्र प्रदेशातील काकीनाडा पोलिस स्टेशनमध्ये हरवलेल्या महिलेबाबत तक्रार नोंदविण्यात आली होती.

आरपीएफ निरीक्षक सत्येंद्र यादव यांना रेल्वे क्रमांक १८०३० च्या ए -२ कोचमध्ये हरविलेल्या महिलेच्या वर्णनाशी मिळती जुळती व्यक्ती आढळली असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच सीपीडीएस टीमने त्वरित कारवाई केली. महिलेची चौकशी करण्यात आली. सदर महिलेने ओळखीच्या व्यक्तीसोबत नागपूरहून लोकमान्य टिळक टर्मिनसकडे जात असल्याचे सांगितले.

दरम्यान, या महिलेच्या सुरक्षिततेसाठी तिला आरपीएफ पोस्ट, नागपूर येथे संरक्षणात ठेवण्यात आले. तसेच काकीनाडा पोलिस ठाण्याला देण्यात आली. त्यानंतर महिला उपनिरीक्षक प्रियंका सिंह यांच्या देखरेखीखाली ऑपरेशन ‘सहयोग’ अंतर्गत कुटुंबीयांसह पोलिस शिपाई ईश्वर राव यांच्या कडे महिलेला सोपविण्यात आले.

## श्री निकेतन महाविद्यालयात ‘करिअर संसद’चे गठन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या ‘करिअर कट्टा’ या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध उपक्रम राबविले जात असून त्यातील एक उपक्रम ‘करिअर संसद’ आहे. श्री निकेतन महाविद्यालयात या विद्यार्थीभिमूख उपक्रमांतर्गत सत्र २०२५-२६ करिता करिअर संसदचे गठन करण्यात आले आहे. महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांमधून सक्रिय असलेल्या विद्यार्थ्यांची मुलाखतीद्वारे त्याकरिता निवड करण्यात आली. करिअर कट्टा समन्वयक प्रा. सारिका विक्रांत पाटील यांच्यामार्फत प्राचार्य डॉ. मेधा कानेटकर, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर, आयक्यूएससी समन्वयक डॉ.कांचन जोशी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. करिअर संसदेमध्ये एकूण दहा पदाधिकारी व तीन सदस्य असे एकूण सदस्य राहतील. या सर्व संसद पदाधिकाऱ्यांना त्यांना दिलेले पद व त्यांचे नियुक्तीपत्र येत्या, १५ जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिनाच्या औचित्य साधून प्राचार्यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत.

# रक्तदानामुळे निर्माण होते धर्मापलीकडचे नाते

## ज्ञानेश्वर रक्षक यांचे प्रतिपादन : वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुंद ठाकरे यांनी केले रक्तदान

**लोकशाही वार्ता/नागपूर**

रक्तदान मानवी मन जोडणारे आहे. रक्तदानातून अनेक गरजू जीवांना नवजीवन मिळू शकते. जात, धर्मापलीकडचे नाते रक्तदानाने निर्माण होत असल्याचे मत राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारेचे अभ्यासक ज्ञानेश्वर रक्षक यांनी व्यक्त केले.

मोठा ताजबाग येथे ‘फैजाने ताजुल ओलिया ओलडेज होम’द्वारे आयोजित रक्तदान शिबिर पार पडले. ही संस्था मुस्लीम तरुणांमध्ये शैक्षणिक जागृतीसोबत आरोग्य शिबिरे, अनाथ मुलांना व वृद्धांना संस्कारी जीवन जगण्यास मदत करते. यावेळी पोलिस स्टेशन सक्करदरा, नागपूर येथील वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुंद ठाकरे यांनी रक्तदान केले. त्यांच्या रक्तदानाने युवकांना प्रेरणा मिळाली. माणसाला अन्न, पाणी, प्राणवायूची गरज आहे. याहीपेक्षा रक्ताची गरज जास्त आहे. दुष्काळात अन्न विदेशातून मागवता येईल. समुद्राच्या पाण्यावर प्रक्रिया करून पिण्यायोग्य करता येईल. ऑक्सीजन कृत्रिम तयार करता येईल. पण, रक्त मानवी शरीरातूनच



निर्माण होऊ शकते. ते कुठल्या फॅक्टरीत निर्माण होणार नाही. देशाच्या रक्षण करणाऱ्या सैनिकांपासून तर शेतीत अन्न पीकविणाऱ्या शेतकऱ्याचे रक्त एकाच रंगाचे असते, असेही ज्ञानेश्वर रक्षक यावेळी बोलतांना म्हणाले.

मौलाना इर्शाद यांच्या मार्गदर्शनात आपला रोजगार सांभाळत अनेक तरुण तन, मन, धनाने सामाजिक कार्यात फैजाने ताजूल औलिया ओलडेज होम या संस्थेला मदत करतात.

यावेळी रक्तदान शिबिराच्या उपक्रमाचे कौतुक वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुंद ठाकरे यांनी केले. श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे रामराव चोपडे यांनी रक्तदान करणाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. शिबिरात ज्या युवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले, त्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी समाजसेवक निखील भुते, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या रक्तपेढीचे डॉ. अनिकेत झोडापे, अधीक्षक विक्रम लांजेवार आणि मेडिकल टीम यांनी सहकार्य केले. मोहम्मद समीर, नावेद भाई, बीलाल भाई यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## दृष्टिक्षेप

### सर्व शाळांच्या शारीरिक शिक्षकांच्या बैठकी सोमवारी

**नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत सन २०२५-२६ या सत्रात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर द्वारा आयोजित करण्यात येणाऱ्या शालेय व इतर क्रीडा स्पर्धा कार्यक्रमाचे अनुषंगाने नागपूर शहरातील मनपा हद्दीतील सर्व शाळांमधील शारीरिक शिक्षकांची बैठक ७ जुलै रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हा नियोजन सभागृह, सिव्हिल लाईन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीकरिता नागपूर शहरातील मनपा हद्दीतील शाळांमधील शारीरिक शिक्षकांनी बैठकीकरीता उपस्थित राहावे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक यांनी कळविले आहे.

### सहकार पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवा

**नागपूर :** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत सहकार पुरस्कारासाठी सहकारी संस्थेचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सहकार महर्षी, सहकार भूषण व सहकार निष्ठ पुरस्कारासाठी १८ जुलैपर्यंत आपल्या संस्थेचे सहकार पुरस्कार सन २०२३-२४ साठी प्रस्ताव संबंधित निबंधक कार्यालयात दाखल करावे. अधिक माहितीसाठी सहाय्यक निबंधक, उपनिबंधक, निबंधक सहकारी संस्था या कार्यालयास भेट देऊन अधिकचा तपशील प्राप्त करून घेता येईल, असे आवाहन करण्यात आले आहे.

### विभागीय लोकशाही दिन १४ जुलै रोजी

**नागपूर :** विभागीय लोकशाही दिनाचे सोमवार (ता. १४ जुलै) सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले आहे. प्रशासनाकडे नागरिकांच्या प्रलंबित असलेल्या तक्रारींचा निपटारा व अनुषांगिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. लोकशाही दिनात अडचणी, गाऱ्हाणी व तक्रारींचा निपटारा करण्यासाठी आवश्यक कागदपत्रासंह सकाळी ११ ते १२ या वेळेत उपस्थित राहण्याचे सामान्य प्रशासन विभागाचे अपर आयुक्त तेजुसिंग पवार यांनी कळविले आहे.

### ऐतिहासिक वारसा लाभलेल्या विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाला ८० वर्षे पूर्ण



**नागपूर :** राज्यशास्त्र विभाग हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विशाल कॅम्पसमध्ये स्थित असून विद्यापीठाचा सर्वात जुना आणि पहिला पदव्युत्तर शैक्षणिक विभाग आहे. मध्य आणि पश्चिम भारतातील विद्यापीठांपैकी कदाचित हा सर्वात जुना पदव्युत्तर शैक्षणिक विभाग असावा. यावर्षी विभाग ८० वर्षांचा वैभवशाली इतिहास साजरा करत असून, विद्यापीठाचेच नव्हे तर समाजाचे आणि राष्ट्राचेही जीवन समृद्ध करणाऱ्या विभागाच्या कार्याची आठवण साजरी करत आहे.

या विभागाचे विद्यार्थी केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर विविध प्रशासकीय पदांवरही कार्यरत झाले आहेत. विद्यापीठ, महाविद्यालय आणि शाळांतील शिक्षक, पत्रकार, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये हे विद्यार्थी कार्यरत आहेत. राज्यशास्त्र विभाग दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम चालवतो. विभागाने विभागीय गरजांची जाण ठेवून इंग्रजीबरोबरच मराठी माध्यमातूनही अध्यापनाची सोय केली आहे. पहिल्या सत्रात विभागात १२० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे. ही व्यवस्था विभागीय तसेच राष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. २०२१ साली विद्यापीठाने गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि स्वतंत्र संशोधनाच्या दृष्टीने सर्व पदव्युत्तर विभागांना स्वायत्तता देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार राज्यशास्त्र विभागदेखील आता एक स्वायत्त विभाग आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू झाल्यानंतर विभागाने नवीन अभ्यासक्रम लागू केला आहे, जो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, कौशल्यविकास व रोजगाराभिमुख गरजांची पूर्तता करतो आणि विविध क्षेत्रांतील संधींसाठी विद्यार्थ्यांना तयार करतो.

# थॅलेसेमियाच्या निकृष्ट गोळ्यांची चौकशी; चाचणी सक्तीची

## विधानसभेत राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आश्वासन : औषधाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याचे निर्देश

**लोकशाही वार्ता/नागपूर**

थॅलेसेमिया रुग्णांच्या समस्यांकडे पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी विधानसभेत लक्ष वेधले. त्यावर सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी खासगी कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या आर्यन केलेशन गोळ्यांची सखोल चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे विधानसभेच्या सभागृहात आश्वासन दिले. तसेच या औषधांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात १२,८०० थॅलेसेमिया रुग्ण आहे. यामध्ये सर्वाधिक रुग्ण विदर्भात आणि विशेषतः नागपूरमध्ये असल्याचे आमदार विकास ठाकरे पावसाळी अधिवेशनात यांनी अधोरेखित केले. त्यांनी मध्य नागपूरमधील डागा रुग्णालयात बांधण्यात आलेले पण, अजूनही सुरू न झालेल्या सीव्हीएस केंद्राचे तत्काळ सुरुवात करण्याची मागणी केली. याशिवाय, बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी रुग्णांना १५ लाख रुपयांची विशेष आर्थिक मदत देण्याची योजनाही सुरू करण्याची त्यांनी मागणी केली. थॅलेसेमिया हा अनुवांशिक आजार आहे आणि तो योग्य उपाययोजनांद्वारे नियंत्रित करता येऊ शकतो. जर मुलगा व मुलगी दोघांची लग्नापूर्वी एचपीएलसी चाचणी टेस्ट करून घेतली आणि दोघेही थॅलेसेमिया पॉझिटिव्ह आढळल्यास त्यांचा विवाह टाळता येतो. सरकारने लग्नापूर्वी एचपीएलसी चाचणी बंधनकारक करावी आणि दोघेही थॅलेसेमिया पॉझिटिव्ह आढळल्यास विवाहास मनाई करावी, जेणेकरून हा आजार संपुष्टात येईल, अशी मागणी आरोग्य तज्ज्ञांकडून होत असल्याचे आमदार विकास ठाकरे यांनी सांगितले.





### औषधे निकृष्ट दर्जाची

**राज्यातील तसेच नागपूरमधील बहुतेक शासकीय रुग्णालयांमध्ये बजाज कंपनीची निकृष्ट दर्जाची औषधे आढळून आली असून, ही औषधे लहान मुले घेण्यास नकार देत आहेत. या कंपनीविरोधात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. शासन नामांकित आणि दर्जेदार औषधांचा पुरवठा करणार का? असा प्रश्न आमदार विकास ठाकरे यांनी उपस्थित केला.**

### विवाहपूर्व 'एचपीएलसी' चाचणी सक्तीवर अभ्यास

**ज्या कुटुंबात एकाचवेळी मायनर आणि मेजर थॅलेसेमिया रुग्ण आढळतात, अशा प्रकरणांमध्ये एचपीएलसी चाचणी सक्तीची करण्यासाठी लवकरच शासन नियमावली आणणार आहे. यासोबतच विवाहपूर्व एचपीएलसी चाचणी सक्तीची करता येईल का, याचा अभ्यास करण्यात येईल. या चाचण्या करून भविष्यात थॅलेसेमियासारखा गंभीर आजार रोखता येऊ शकतो.**

# स्वरवेधतर्फे 'गजर विठ्ठलाचा' उद्या

**लोकशाही वार्ता/नागपूर**

आषाढी एकादशीच्या पर्वणीवर महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरपूरच्या पांडुरंगाच्या दर्शनाची लाखो वारकऱ्यांना आस लागली असते. आषाढी एकादशीच्या पर्वावर दरवर्षीप्रमाणे स्वरवेध नागपूरतर्फे गजर विठ्ठलाचा या संगीतमय दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. ५ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता सायंटिफीक सभागृह, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर, नागपूर येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचा महागायक अनिरुद्ध जोशी तसेच नागपुरातील गुणी गायक निरंजन बोबडे (सा रे ग म प फेम), यश खेर, आदित्य सावरकर, पारिजात काळीकर, राधा ठेंगडी, साक्षी सरोदे, श्रुती बाईवार-गाडे व लक्षती काजळकर-भुसारी हे गुणी कलाकार एकूण २५ भक्तिमय कलाकृती सादर करतील.या कार्यक्रमाची संकल्पना अॅड. भानुदास कुलकर्णी यांची असून कार्यक्रमाचे निरूपण व निवेदन मुकुंद देशपांडे करतील. स्वरवेधचे यशस्वी वादक गायकांना साथ करणार आहेत.

हा कार्यक्रम निःशुल्क असून रसिकांनी उत्कट प्रतिसाद द्यावा असे आवाहन स्वरवेधचे अॅड. आनंद परचुरे आणि अॅड. भानुदास कुलकर्णी यांनी केले आहे.

# ऊस उत्पादन वाढीसाठी 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर

## अॅग्रोव्हिजनतर्फे विशेष कार्यशाळा

**लोकशाही वार्ता/नागपूर**

शेतीमध्ये आधुनिक विज्ञानाचा वापर करून उत्पादन व शाश्वतता वाढवण्याच्या दिशेने उचललेले पाऊल म्हणून अॅग्रोव्हिजनतर्फे ऊस शेतीसाठी एआय तंत्रज्ञान या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा रविवारी (ता. ६ जुलै) रोजी, दुपारी १ वाजता एनबीबीएस सभागृह, (राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व भूमी उपयोग संस्थान) अमरावती रोड नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. यात शेतक-यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोग आणि फायदे यांची सखोल माहिती मिळणार आहे. या विशेष कार्यशाळेला अॅग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील. त्यांनी सुरू केलेले अॅग्रोव्हिजन हे व्यासपीठ गेल्या अनेक वर्षांपासून विदर्भासह संपूर्ण भारतातील शेतक-यांसाठी आधुनिक शेती पद्धतीचे मार्गदर्शन करणारे आणि शेतीला विज्ञानाधारित स्वरूप देणारे प्रभावी अभियान ठरले आहे. अॅग्रोव्हिजनच्या माध्यमातून पारंपरिक शेतीच्या कक्षा वाढवून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, नव्या पिकांच्या संधी उपलब्ध करून देणे आणि शेतीला उद्योगाचे स्वरूप देणे, ही उद्दिष्टे नेहमीच ठळक राहिली आहेत. विदर्भातील दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाताना, अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी व्यवहार्य व फायदेशीर पर्याय शोधून देण्याचे कार्य या मंचाने सातत्याने केले आहे. कार्यशाळेत डॉ. विवेक भोईटे, मृदा शास्त्र विषयाचे तज्ज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथून आणि डॉ. राजेंद्र पवार, बारामती येथून शेतकऱ्यांना एआयचा ऊस शेतीतील उपयोग, जमिनीची गुणवत्ता सुधारणा, अचूक पाणी व्यवस्थापन, पीक रोग व्यवस्थापन यावर आधारित मार्गदर्शन करतील. अॅग्रोव्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र बोरटकर, मार्गदर्शक डॉ. सी. डी. मायी, सुधीर दिवे, डॉ. समय बनसोड, आनंदराव राऊत, भोजराम कापगते, अनिल जोशी यांच्या पुढाकाराने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून कार्यशाळेसाठी इच्छुक शेतकऱ्यांनी नोंदणी करून उपस्थित राहावे व आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता व ऊस लागवडीतील नवकल्पनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# 'बार्टी'मार्फत 'जेईई' आणि 'नीट'च्या प्रशिक्षणासाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरू

**लोकशाही वार्ता/नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी जेईई आणि नीट या प्रवेश परीक्षांचे निःशुल्क अनिवासी प्रशिक्षणासाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बार्टीमार्फत मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी २०० जागांकरिता प्रशिक्षण राबविण्यात येणार आहे.

प्रशिक्षणासाठी विद्यार्थी इयत्ता ११ (विज्ञान) शाखेत प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्यांजवळ महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा व अधिवास दाखला असावा. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांच्या घरात असावे. विद्यार्थी दिव्यांग असल्यास ४० टक्केपेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी. जेईई आणि नीट प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी नमूद केल्याप्रमाणे महिला ३० टक्के, दिव्यांग ५ टक्के, अनाथ १ टक्के, वंचित ५ टक्के जागा आरक्षित असतील. प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने इयत्ता १० वीच्या गुणांच्या आधारे गुणवत्ता निहाय उमेदवारांची निवड करण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी २४ महिन्यांचा असणार आहे. प्रशिक्षण काळात ७५ टक्केपेक्षा जास्त उपस्थिती राहिल्यास विद्यार्थ्यांना दरमहा ६ हजार एवढे विद्यावेतन दिल्या जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना पुस्तक संचाकरिता प्रती विद्यार्थी ५ हजार एवढी एकरकमी रक्कम अदा करण्यात येणार आहे. या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करायचा आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३० जुलै आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी https://cpetp.barti.in या लिंकवरुन ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन महासंचालक बार्टी मार्फत करण्यात आले आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत शैक्षणिक प्रवेशासह विविध सुविधा

**लोकशाही वार्ता/नागपूर**

दिव्यांग कल्याण विभागांतर्गत नागपूर येथे तीन शासकीय दिव्यांग संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी शासकीय बहुउद्देशीय दिव्यांग मुलांचे संमिश्र केंद्र नागपूर व शासकीय दिव्यांगांची कर्मशाळा हे नागपूर येथील मंगळवारी बाजार सदर येथे तर शासकीय दिव्यांग बाल विकास गृह हे प्रतापनगर येथे कार्यरत आहेत. या संस्थामध्ये दिव्यांग प्रवर्गातील अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक, वैद्यकीय व व्यावसायिक पुनर्वसन शासनामार्फत निशुल्क करण्यात येते.

शासकीय बहू दिव्यांग मुलांचे संमिश्र केंद्र नागपूर व शासकीय दिव्यांग बाल विकास गृह प्रतापनगर नागपूर येथे वयोगट ६ ते १६ वर्षे वयोगटातील अस्थिव्यंग व मुकबधीर विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शहरातील अग्रगण्य मराठी शाळेतून मोफत शिक्षण उपलब्ध करून दिल्या जाते तसेच या विद्यार्थ्यांना मोफत वसतिगृह, आवश्यक शैक्षणिक सुविधा, गणवेश, पाठ्यपुस्तके, श्रवणयंत्रे व नियमित व्यायामाच्या सोयी सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात.

शासकीय दिव्यांगांची कर्मशाळा सदर नागपुर येथे वयोगट १८ ते ३५ वर्षे वयोगटातील व्यावसायिक आमेचर कोसेंस जसे संगणक प्रशिक्षण, वाइंडिंग व पुस्तक मेकिंग इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रम मोफत शिकविले जातात तर हे कोसेस ला प्रवेश घेणाऱ्या दिव्यांग व्यक्तीना मोफत वसतिगृह, आवश्यक शैक्षणिक सुविधा, गणवेश, पाठ्यपुस्तके व श्रवणयंत्रे इत्यादी सोयी सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात. या तिन्ही शासकीय संस्थेतील सन २०२५-२६ या वर्षातील प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून प्राधान्याने प्रथम येणाऱ्या दिव्यांग व्यक्तीस प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात येते.

# कोळसा खाणग्रस्त पद्मापूर ग्रामस्थांना न्यायाची आशा

## वेकोलिची उच्च न्यायालयात शरणागती, पुनर्वसनाचे लेखी आश्वासन देण्याचे आदेश

**लोकशाही वार्ता/नागपूर**

चंद्रपूर जिल्ह्यातील दुर्गापूर खुल्या कोळसा खाणीमुळे प्रभावित झालेल्या मसाळा तुकुम येथील पद्मापूर गट ग्रामपंचायतीच्या पुनर्वसनाची मागणी करीत उपसरपंच महेंद्र मेश्राम यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणावर सुनावणी करताना न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती सचिन देशमुख यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी वेकोलिने अखेर शरणागती पत्करत पुनर्वसन करण्याचे तोंडी आश्वासन दिले. न्यायालयाने वेकोलिला आठवड्याभरात लेखी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले असून, पुढील सुनावणी तहकूब करण्यात आली आहे.



वेकोलिने दुर्गापूर कोळसा खाणीच्या परिसरातील तीन गावांचे पुनर्वसन आधीच केले आहे. मात्र, मसाळा गावालाही पर्यावरण मंत्रालयाची पुनर्वसनास मंजुरी मिळालेली असताना त्या गावाच्या जमिनीचे अधिग्रहण वा पुनर्वसनाचा विचार करण्यात आलेला नव्हता. मसाळा गाव खाणीपासून अवघ्या काही मीटर अंतरावर असून डम्पिंग क्षेत्राच्या अगदी शेजारी आहे. वेकोलिच्या हलगर्जी कारभारावर न्यायालयाने थेट लक्ष घातले असून, स्थानिकांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. पुढील आठवड्यात लेखी उत्तर आल्यानंतर न्यायालय अंतिम निर्णय देण्याची शक्यता आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने अॅड. शिल्पा गिरटकर यांनी युक्तिवाद केला. वेकोलिच्या वतीने ज्येष्ठ वकील आनंद जयस्वाल तर अॅड. नचिकेत मोहरील यांनी सहकार्य केले.

### वेकोलिच्या दाव्यास खंडपीठाचा प्रतिकार

**सुरुवातीला वेकोलिने हे गाव खाणीतून प्रभावित नाही, असा दावा केला होता. मात्र याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सादर केलेल्या स्पष्ट पुराव्यांमुळे सत्य उजेडात आले. त्यानंतरच वेकोलि नरम पडली आणि पुनर्वसनाचे आश्वासन दिले.**

# विहांग रंगारी हत्याकांडातील मुख्य आरोपी गजाआड

## सहा महिन्यानंतर अटक : आरोपीची संख्या नऊ

**लोकशाही वार्ता/नागपूर**

यशोधरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शिवछत्रपती मंगल कार्यालयात सुरू असलेल्या भांडणात एका युवकाने मध्यस्थी केली असता त्याला आरोपींच्या टोळीने चाकूने वार करीत बेदम मारहाण केल्याने या युवकाचा मृत्यू झाला होता. या हत्याकांडातील आठ आरोपींना पोलिसांनी अटक केली होती. परंतु, घटनेतील मुख्य आरोपी फरार होता. तब्बल सहा महिन्यानंतर त्याला अटक करण्यात पोलिसांना यश आले.



बिरजू दीपक वाढवे (३३, मायानगर, ललित कला भवनसमोर, जरीपटका) असे अटकेतील मुख्य आरोपीचे नाव आहे. तर विहांग मनीष रंगारी (२४, टेका नाका मानवनगर) असे हत्याकांडातील मृताचे नाव आहे. मागील दोन फेब्रुवारी रोजी गुरुवारी रात्री अकरा वाजता विहांग रंगारी हा मित्राच्या लग्न समारंभात आला होता. लग्नात आरोपी बिरजू वाढवे आणि त्याच्या सहकाऱ्यांचे काही युवकांसोबत भांडण सुरू होते. त्या भांडणात मध्यस्थी करण्यासाठी विहांग रंगारी यांनी पुढाकार घेतला. समारंभात महिला आहेत शिवीगाळ करू नका, असे म्हणताच बिरजू वाढवे आणि त्याच्या टोळीने मिळून विहांगवर प्राणघातक हल्ला केला. चाकूने आणि गट्टूने वार करीत त्याला रक्ताच्या थारोळ्यात लोळविले आणि पळून गेले. जखमी विहांगला मेयो रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले होते. या प्रकरणी यशोधरानगर पोलिसांनी बिरजू वाढवे तसेच त्याच्या टोळीविरुद्ध हत्याकांडाचा गुन्हा दाखल केला होता.

तपासात पोलिसांनी हत्याकांडातील आठ आरोपींना अटक केली होती. परंतु, बिरजू मात्र पोलिसांना चकमा देत पळून गेला. पोलिस त्याच्या मागावर होती. परंतु, दरवेळी तो पळून जाण्यात यशस्वी होत होता. अशातच पोलिसांनी केलेल्या तांत्रिक तपासानंतर सापळा रचून बिरजूला अटक करण्यात पोलिसांना यश आले. त्यामुळे या हत्याकांडातील आरोपींची संख्या आता नऊ झाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध संघटित गुन्हेगारी कलम १११(२) भान्यासं अन्वयेदेखील गुन्हा दाखल केला आहे.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज ई-ग्रंथालय विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे केंद्र

## ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र

**लोकशाही वार्ता/नागपूर**

नागपूर महानगरपालिकेने दोन वर्षांपूर्वी महाल परिसरात सुरू केलेले राजर्षी छत्रपती शाहू महाराज ई-ग्रंथालय विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे महत्त्वपूर्ण केंद्र बनले आहे. या ई-ग्रंथालयाने महाल परिसरातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात मोलाची भूमिका बजावत आहे. या ग्रंथालयात अभ्यास करून अनेक विद्यार्थ्यांनी सीए, एमबीबीएस डॉक्टरसारख्या पदव्या मिळविल्या तर काहींची शासकीय सेवेतही निवड झाली आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र सुरू केले आहे. या उपक्रमामुळे या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या नेतृत्वात आणि शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ग्रंथालय अधीक्षक मंजुषा कन्हेरे यांच्या देखरेखीखाली महानगरपालिकेची ग्रंथालये अधिकाधिक अभ्यास केंद्रे म्हणून विकसित केली जात आहेत. या ई-ग्रंथालयाच्या माध्यमातून



विद्यार्थ्यांना अभ्यासाची सोय उपलब्ध करून दिली आहे. सुरुवातीला चिटणवीसपुरा येथे नागरिकांसाठी केवळ वृत्तपत्र वाचनालय उपलब्ध होते. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी कोणतीही सुविधा नव्हती, ही अडचण लक्षात घेऊन महानगरपालिकेने राजर्षी छत्रपती शाहू महाराज ई-ग्रंथालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. या ई-ग्रंथालयाचे लोकार्पण १ एप्रिल २०२३ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, आमदार प्रवीण दटके व इतर मान्यवरांच्या हस्ते झाले.

### संगणक व इंटरनेटची सुविधा

**मनपा ग्रंथालय प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या शिस्तीसाठी कडक नियम तयार केले आहेत. अभ्यासिकेचा उपयोग करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रतिमाह ३०० रुपये आणि संगणक-इंटरनेटचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रतिमाह ५०० रुपये शुल्क आकारले जाते. ग्रंथालयात शांततेने अभ्यास करतील अशाच विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची संधी दिली जात असल्याची माहिती ई-ग्रंथालयाचे प्रभारी संजय सुनेरी यांनी दिली. विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांसाठी लागणारे स्थानिक आणि राष्ट्रीय वर्तमानपत्र देखील उपलब्ध आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज ई-ग्रंथालयात मुले आणि मुलीसाठी अभ्यासासाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून दिली आहे.**

### ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र

**नागपूर महानगरपालिकेने चार मजली इमारत बांधली असून, त्यात विविध सुविधा उपलब्ध आहेत. पहिला मजल्यावर कार्यालय, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र आणि वृत्तपत्र वाचनालय कक्ष आहे. येथे ज्येष्ठ नागरिक वाढदिवस साजरा करतात. यामुळे या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.**

ई-ग्रंथालयाचे लोकार्पण झाल्यापासून अवघ्या दोन वर्षात या ई-ग्रंथालयाने मोठी झेप घेतली आहे. या ग्रंथालयातून अभ्यास करून ५ विद्यार्थी सीए बनले आहेत, तर ४ विद्यार्थी एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी यशस्वी झाले आहेत. याव्यतिरिक्त ४ विद्यार्थ्यांची बँकेत निवड झाली आहे. सध्या मेयो आणि शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील विद्यार्थी ही या ग्रंथालयाला अभ्यासासाठी अधिक पसंती देत असतात. याव्यतिरिक्त यूपीएससी, एमपीएससी, बँक, रेल्वे, पोलिस भरती आणि इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या लायब्ररीचा मोठा फायदा होत आहे.

# 'पाऊले चालती पंढरीची वाट' भक्तिमय गीतांचा कार्यक्रम आज

## आषाढी एकादशीनिमित्त विशेष आयोजन

**लोकशाही वार्ता/नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आषाढी एकादशी निमित्त 'पाऊले चालती पंढरीची वाट' हा भक्तिमय गीतांचा कार्यक्रम शुक्रवार, ४ जुलै रोजी संध्याकाळी ६.३० वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजीत करण्यात आला आहे.



कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशीष शेलार यांची असून संयोजन आ. प्रवीण दटके यांचे आहे. या कार्यक्रमामध्ये सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध जोशी, शमिका भिडे, भूषण जाधव, निकेता जोशी व चंद्रकांत शिंदे विविध भक्तिगीते सादर करतील. संगीत संयोजन परिमल जोशी यांचे असून निवेदन आसावरी गलांडे-देशपांडे करणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे व सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबईचे संचालक विभिषण चवरे यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रमात होत आहे. या निःशुल्क कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.